श्रद्धांजली



जॉनी वॉकर: हसरा तारा निखळला...

'जी' चा हा अंक पूर्ण होतानाच जॉनी वॉकर यांच्या निधनाची बातमी समजली, त्यावेळी *आनंद*मधला मुरारीलाल आठवला; 'हम सब रंगमंच की कठपुतलीयां है... डोर उपरवाले के हाथ में है... आज हमारी डोर खिंच ली उसने...'

पण जाण्यापूर्वी त्यांनी आपली प्रदीर्घ कारकीर्द मागे ठेवली. जवळजवळ अर्धशतक ते या रुपेरी पडद्यावर वावरले. सुमारे ३०० चित्रपटांत अभिनय केला. अखेरच्या दिवसांत हा गुणी कलाकार जणू विस्मृतीच्या पडद्याआड गेला होता. त्यानंतर अचानक ९०च्या दशकात कमल हसनच्या *चाची ४२०*मध्ये ते मेकअप आर्टिस्ट म्हणून एक वेगळीच भूमिका निभावते झाले.

मूळ इंदोरचे हे बदरुद्दीन काझी स्वभावाने अतिशय गंभीर. कधी भेटायला गेलंच तर लांब चेहरा करून समोर येणार, पण पडद्यावर मात्र ते नेहमीच हसताना आणि हसवताना दिसले.

गुरुदत्तचा *प्यासा* आठवा. 'ये महलों ये तख्तों, ये ताजों की दुनिया...' सारखं करुण गीत गाणाऱ्या कविवर बेतलेल्या या चित्रपटातही जॉनी वॉकरचं 'सर जो तेरा चकराये या दिल डुबा जाये...' सारखं गाणं गाऊन जॉनी वॉकरनी चाहत्यांची वाहवा मिळवली होती. हे गाणं गुरुदत्तनी खास जॉनी वॉकरना समोर ठेवून चित्रपटात मागाहून घातलं होतं.

गुरुदत्त अनेक बाबतीत जॉनी वॉकरसाठी खऱ्या अर्थाने गुरू ठरले. बदरुद्दीनला 'जॉनी वॉकर' हे फिल्मी नावही त्यांनीच दिली. 'गुरू नसते तर मी आयुष्यभर कंडक्टरच राहिलो असतो. मात्र ते काम करतानाही लोकांचं मनोरंजनही नक्कीच केलं असतं.' असं जॉनी वॉकर नेहमी म्हणत.

बस कंडक्टर मधून अभिनयात पदार्पण करणाऱ्या या गुणी कलाकाराने मुंबईतील जीवघेण्या बस विस्फोट दुर्घटनेच्या दुसऱ्याच दिवशी जगाचा निरोप घेतला. *सीआयडी, मिस्टर ॲण्ड मिसेस ५५, चौदवी का चांद, मधुमती, चोरी चोरी*सारख्या अनेक चित्रपटांतील त्यांच्या व्यक्तिरेखा चाहत्यांच्या मनात आजही जीवंत आहेत.



लीला चिटणीस: असामान्य व्यक्तिमत्व

हिंदी चित्रपटांच्या बाल्यावस्थेपासून प्रौढावस्थेपर्यंतचा प्रवास ज्यांनी अनुभवला त्या प्रसिद्ध अभिनेत्री लीला चिटणीस यांचं ९३व्या वर्षी न्यूयॉर्कमध्ये निधन झालं.

१९१०मध्ये कर्नाटकमधील कारवार येथे लीला चिटणीस यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. म्हणून त्या एका नाट्यसंस्थेत काम करू लागल्या. लग्नानंतर त्यांना चार अपत्य झाली. पुढे पतीशी पटत नाही म्हणून त्या मुलांसह वेगळ्या झाल्या. चार-चार मुलांचा सांभाळ करण्यासाठी ३०च्या दशकात त्यांनी चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. त्या काळातील शिखराची निर्मिती संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बॉम्बे टॉकीजच्या अनेक चित्रपटांमधून त्यांनी आपल्या प्रतिभेची चुणूक दाखवली. सोज्वळ रुपातली त्यांची नायिका दर्शकांना भावत असे. ३०च्या दशकात आणि ४०च्या सुरुवातीला लीला चिटणीस यांची अशोककुमारबरोबर जोडी हिट ठरली होती. या जोडीने *बंधन, कंगन* आणि *झुल*सारखे अनेक दर्जेदार हिट चित्रपट दिले.

पण आजचा हिरो उद्या झीरो झालेला असतो, हा या क्षेत्राला लाभलेला मोठा शाप आहे. हे ओळखूनच की काय नायिका म्हणून आपली सद्दी संपत आली आहे हे लक्षात येताच त्यांनी चरित्र भूमिका स्वीकारायला सुरुवात केली. १९४८मध्ये *शहीद* चित्रपटात त्या प्रथम चरित्र भूमिकेत चमकल्या. त्यानंतर १९५१मध्ये प्रदर्शित झालेल्या *आवारा*मधली त्यांची चरित्र भूमिकाही लोकांच्या लक्षात राहिली. पुढे ६०च्या दशकापर्यंत दिलीपकुमार, देव आनंद, राज कपूर यांसारख्या अभिनेत्यांच्या आईच्या भूमिकेत त्या दिसल्या. या चरित्र भूमिकांतही त्यांनी तेवढेच गहिरे रंग भरले.

प्रतिकूल कौटुंबिक परिस्थितीशी झगडत लीला चिटणीस यांनी आपली कारकीर्द सांभाळली. चार मुलांपैकी एक कन्या आणि एका पुत्राच्या वियोगाचं दुःखही त्यांनी पचवलं. वयाच्या ८०व्या वर्षी त्या अमेरिकेला गेल्या पण, तिथल्या संस्कृतीच्या आहारी गेलेल्या त्यांच्या मुलांनी त्यांची खानगी डेनबरी नर्सिंग होममध्ये केली. दोन वर्षांपूर्वी अमेरिका भेटीवर गेलेल्या शशीकला यांनी त्यांची भेट घेतली तेव्हा एकेकाळच्या सुपरस्टारची ही दुरवस्था बघून त्यांना वाईट वाटलं होतं.

असो! आज त्या सगळ्याच्याच पलिकडे गेल्या आहेत पण, त्यांच्या चित्रपटांमुळे त्या चाहत्यांच्या मनात अमर आहेत.